


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ७३ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०६ वैशाख शके १९४८, रविवार दि.२६ एप्रिल २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

### विक्रमी मतदान निश्चितच सुदृढ लोकशाहीचे सकारात्मक लक्षण

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूतील विधान सभा निवडणुकांसाठी पहिल्या टप्प्यात बंगालमध्ये ९२..टक्के तर तामिळनाडू मध्ये ८४ टक्के होऊन अधिक मतदान झाले. या दोन्ही राज्यात मतदारांनी मोठ्या उत्साहाने मतदान प्रक्रियेत आज दोन आपली राजकीय सहभागीता वाढविली.पश्चिम बंगाल मध्ये १५२ जागांसाठी ,९२ तर तामिळनाडूमध्ये २३४ जागांसाठी टक्के विक्रमी मतदान झाले.

विक्रमी मतदान हे निश्चितच एका चैतन्यशील आणि सुदृढ लोकशाहीचे सकारात्मक लक्षण मानले जाते. ते राजकीय प्रक्रियेतील नागरिकांचा सहभाग, जागरूकता आणि व्यवस्थेवरील विश्वास दर्शवते.

विक्रमी मतदान आणि शांततापूर्ण मतदान, हे लोकशाहीचा सर्वात प्रभावी संदेश देतात. जेव्हा लोक मोठ्या संख्येने मतदान करतात, तेव्हा ते व्यवस्थेवरील त्यांचा विश्वास आणि मतदानाचा हक्क बजावण्याची त्यांची उत्सुकता दर्शवते.

मतदानाचा टक्का हा लोकशाहीवरील नागरिकांचा गाढ विश्वास, राजकीय जागरूकता आणि व्यापक सहभाग दर्शवतो. त्यामुळे सरकारची वैधता बळकट होते आणि निवडून आलेले प्रतिनिधी लोकांच्या इच्छेचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करतात हे सुनिश्चित होते, जे सुशासन आणि उत्तरदायित्वासाठी अत्यावश्यक आहे.

उच्च मतदान टक्केवारी हे दर्शवते की सरकारला जनतेकडून प्रबळ जनादेश मिळाला आहे, ज्यामुळे सरकारची निर्णयक्षमता आणि वैधता वाढते.

मतदान नागरिकांना शासकाला जबाबदार धरण्याचे सामर्थ्य देते यामुळे निवडणुकांची निष्पक्षता आणि जनतेचा विश्वास वाढतो.पश्चिम बंगालमधील ९२% पेक्षा जास्त मतदान टक्केवारी हा एक विक्रम आहे, जो निवडणूक धोरणांमध्ये आणि लोकशाहीमध्ये सक्रिय सहभाग दर्शवतो

उच्च मतदानामुळे अधिक सुदृढ समाज निर्माण होतो, कारण निवडून आलेले अधिकारी मतदारांना उत्तरदायी असतात. लोकांना आपली मते व्यक्त करण्याचा आणि सरकार जनतेच्या इच्छेनुसार काम करेल याची खात्री करण्याचा हा एक मार्ग आहे.

विक्रमी मतदान हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर तो लोकांचा विश्वास, उत्साह आणि लोकशाहीसमोरील आव्हाने समजून घेण्याच्या क्षमतेचे प्रदर्शन आहे. तसेच, वंचित गटांसाठी समानता आणि प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचे हे एक शक्तिशाली साधन आहे.

मतदान हा केवळ एक हक्क नाही, तर एक जबाबदार नागरिक म्हणून राष्ट्राच्या विकासात सहभागी होण्याचे एक साधन देखील आहे.

लोकशाही व्यवस्थेमध्ये मतदानाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य, लोकांद्वारे चालविलेले राज्य. या व्यवस्थेत नागरिकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिलेला असतो. हा अधिकार मतदानाद्वारेच वापरला जातो. त्यामुळे मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आणि कर्तव्य मानला जातो.

मतदान महत्त्वाचे असण्याचे कारण म्हणजे नागरिकांना आपले प्रतिनिधी निवडण्याची संधी मिळते. देश, राज्य किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये योग्य आणि प्रामाणिक प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान आवश्यक असते. जर नागरिकांनी योग्य व्यक्तीची निवड केली, तर शासन चांगले चालते आणि देशाचा विकास होतो.

मतदान केल्याने लोकशाही मजबूत होते. जास्तीत जास्त लोकांनी मतदान केल्यास लोकशाही अधिक प्रभावी बनते. जर लोकांनी मतदानाकडे दुर्लक्ष केले, तर चुकीच्या किंवा अयोग्य व्यक्ती सत्तेत येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने मतदान करणे आवश्यक आहे.

मतदानामुळे नागरिकांना आपले मत आणि हक्क व्यक्त करण्याची संधी मिळते. मतदान हा नागरिकांचा आवाज असतो. मतदानाच्या माध्यमातून नागरिक आपल्या देशाच्या भविष्यासाठी निर्णय घेऊ शकतात.याशिवाय, मतदानामुळे समाजात समानतेची भावना निर्माण होते. श्रीमंत असो वा गरीब, शिक्षित असो वा अशिक्षितप्रत्येकाचे मत समान मूल्याचे असते. त्यामुळे मतदान सर्वांना समान अधिकार देणारी प्रक्रिया आहे.

शेवटी, मतदान हे केवळ अधिकार नसून एक जबाबदारीही आहे. देशाच्या प्रगतीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने नक्कीच मतदान केले पाहिजे.

मतदान हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहे. देशाचा विकास, सुशासन आणि लोकशाहीची मजबुती यासाठी मतदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपले मतदानाचे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले पाहिजे.

# छत्रपती संभाजीनगरात “अमृत पेठ २०२६” मेळावा

**उद्योजकांनी स्वकर्तृत्वाने नवा इतिहास घडवावा-विवेक देशपांडे**

**गुणवत्ता हाच भावी प्रगतीचा मार्ग-डॉ. वि.ल. धारूरकर**





ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच नागरिकांना थेट उत्पादकांकडून दर्जेदार वस्तू उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने ‘‘अमृत पेठ २०२६’’ या भव्य मेळाव्याचे आयोजन येथे करण्यात आले आहे. हा मेळावा २४ ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान विघ्नहर्ता गणपती मंदिर परिसर, एन-३ सिडको, छत्रपती कॉलेजजवळ सुरु असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

तरुण उद्योजकांनी स्वकर्तृत्वाने नवा इतिहास घडवावा असे आवाहन ज्येष्ठ उद्योगपती श्री विवेक देशपांडे यांनी केले. ते महाराष्ट्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत आयोजित वस्तू व सेवांच्या प्रदर्शनात विघ्नहर्ता गणेश मंदिर सभागृहात बोलत होते.

याप्रसंगी माजी कुलगुरू डॉक्टर विल धारूरकर हे अध्यक्षस्थानी होते.

आपल्या भाषणात विवेक देशपांडे पुढे म्हणाले की समाजातील निराधार असलेल्या आणि कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसलेल्या समूहासाठी अमृत ही एक विकास प्रेरक योजना आहे या योजनेतून समाजातील या घटकांचे आर्थिक स्थैर्य वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे या योजनेचा लाभ घेऊन तरुण उद्योजकांनी पुढे आले पाहिजे आणि आपले कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे कुठलीही योजना ही परिपूर्ण नसते त्या योजनेतील कल्पकता लक्षात घेऊन आपण तिचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी बोलताना नगरसेविका अदवंत यांनी अमृत योजनेतील उपक्रमशीलतेचे कौतुक केले आणि लोकाभिमुख होऊन अधिकारी मंडळी उद्योजकापर्यंत जात आहेत व त्यांना प्रदर्शनासाठी प्रेरणा देत आहेत ही गोष्ट समाधानाची आहे असे त्यांनी सांगितले याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते विजय जोग भाजप ग्रामीणचे उपाध्यक्ष जयराज कुटे इत्यादी उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. वि ल धारूरकर म्हणाले की २१ वे शतक हे गुणवत्तेचे शतक आहे आता भारताने सर्व युरोपियन युनियन बरोबर मुक्त व्यापार करार केला आहे युरोपच्या बाजारपेठा काबीज करण्याची मोठी संधी भारतीय उद्योजकांना लाभली आहे याप्रसंगी आपण आपल्या वस्तू व सेवांमध्ये गुणवत्तेचा प्राण ओतला पाहिजे आणि जगाच्या सर्व बाजारपेठेत आपल्या वस्तू व सेवा या गुणवत्तेच्या आधारे पुढे पोहोचवल्या पाहिजेत. त्यांनी आपल्या भाषणात असेही सांगितले की चीन प्रमाणे भारतातील प्रत्येक घरात काही ना काही उद्योग विकसित केला पाहिजे लघुउद्योगाच्या विकासात महिला उद्योजक, तरुण उद्योजक, ग्रामीण लघुउद्योजक या सर्वांचे महत्त्वाचे स्थान असणार आहे लघु आणि मध्यम उद्योगाने मोठी गरुड झेप घेतल्यामुळेच भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलेला आहे आणि तो आता भविष्यात अधिक गतीने पुढे वाटचाल करत आहे.

भारताची आर्थिक क्रांती २०१४ ते २०१७ या आपल्या नियोजित ग्रंथातील काही महत्त्वपूर्ण सूत्रे ही डॉ. धारूरकर यांनी मांडली ते म्हणाले की आशिया खंडातील देशांमध्ये भारताचे आर्थिक स्थैर्य अत्यंत महत्त्वाचे आहे कारण कृषी क्षेत्रात केलेल्या क्रांतीमुळे आपल्या अर्थव्यवस्थेला बळकटी आली आहे आता भारत चीन आणि अमेरिकेशी सुद्धा कृषी क्षेत्रात स्पर्धा करत असून अनेक बाबतीत त्या दोघांनाही भारताने मागे टाकले आहे. पोलंड येथील आठव्या अर्थशास्त्र परिषदेतील त्यांनी मांडलेल्या शोधनिबंधाचाही त्यांनी परामर्श घेतला. शेतीबरोबरच लघु व मध्यम उद्योगातील मौलिक बदल स्टार्टअप चा उदय आणि शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक बदलाचे संकेत यामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी आली आहे असेही त्यांनी सांगितले.

पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले भारत माता पूजनानंतर आयोजकांच्या वतीने पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच यानिमित्ताने प्रत्येकाला ग्रंथ ही भेट देण्यात आले.

मेळाव्याचे उद्घाटन समाजभूषण उद्योजक विवेक देशपांडे (रुद्रानी इन्फ्रास्ट्रक्चर), नगरसेविका माधुरीताई अदवंत, अमृतचे राज्य व्यवस्थापक दीपक जोशी, भाजपा ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष जयराज कुटे, विजया कुलकर्णी, युवा डिजिटल उद्योजक श्री प्रतीक शिरसे आणि सामाजिक कार्यकर्ते विजयजी जोग आदी मान्यवर उपस्थित होते.

या मेळाव्यात स्वदेशी बाजारपेठेअंतर्गत विविध उद्योजक, महिला बचत गट तसेच स्टार्टअप्स यांनी सहभाग नोंदविला आहे. घरगुती उत्पादने, हस्तकला, स्वादिष्ट खाद्यपदार्थ, कपडे आणि दैनंदिन वापराच्या वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदीसाठी गर्दी केली आहे.

या उपक्रमाचे नियोजन जिल्हा व्यवस्थापक अक्षय लंबे यांनी केले असून, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे यांनी केले. तसेच अमृत सखी मंजू कुलकर्णी, ऋचा शर्मा आणि विनया कुलकर्णी यांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# अक्षरलेणं साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रल्हाद लुलेकर

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – मराठी साहित्य मंडळ व माय प्रकाशनाच्या वतीने आयोजित पहिल्या अक्षरलेणं साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विचारवंत, समीक्षक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख डॉ. प्रल्हाद लुलेकर यांची निवड करण्यात आली आहे.


१ मे रोजी लोहा, जि. नांदेड येथे हे साहित्य संमेलन होत आहे. डॉ. लुलेकर यांनी विपुल प्रमाणात लेखन केले आहे. मराठवाड्यातील मराठी वाड्.मयाचा इतिहास., मराठी व्याकरण आणि लेखन, अनिवार्य मराठी : व्याकरण, लेखन आणि आकलन ही अभ्यासक्रमीय पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. मराठवाड्याचे साहित्य, जातक (दत्ता भगत गौरवग्रंथ), निवडक उत्तम कांबळे, दु:खाविषयी निबंध- मुक्ता साळवे, आस्वाद आणि समीक्षा (प्रा. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या निवडक प्रस्तावना), सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, शेतकऱ्याचा असूड, समग्र वाड्.मय : सावित्रीबाई फुले. या पुस्तकांचे त्यांनी संपादनही केलेले आहे.



त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीचे दोन पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचा साहित्य पुरस्कार, अन्य संस्थांचे साहित्य पुरस्कार मिळाले आहेत.

यापूर्वी डॉ. लुलेकर यांनी हिंगोली येथे पार पडलेल्या १४ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले आहे. यासोबत कर्नाटकातील कडोली येथील प्रादेशिक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान त्यांना मिळाला आहे. डॉ. लुलेकर यांच्या निवडीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.






## जात्यावरच्या ओव्या......

ऊन चैत्र वैशाखाच
रानी पेटला वणवा
देवा पाडावा पाऊस
तुम्हा पाठवू सांगावा ?||६१३||

ऊन चैत्र वैशाखाच
तळी आटली समदी
तडफडती मासोळी
झाले बगळे आनंदी ||६१४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २४




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

रघूनायकावीण वाया शिणावे ।
जनासारिखे व्यर्थ का वोसणावे ।।
सदा सर्वदा नाम वाचे वसो दे ।
अहंता मनी पापिणी ते नसो दे ।२४।

अर्थ : हे मना, एका रामाला सोडून केलेली सगळी कामे व्यर्थ आहेत. भगवंताला विन्मुख झालेल्या सामान्य माणसांप्रमाणे व्यर्थ बडबड ( वोसणावे ) करू नये. त्या बाष्कळ बडबडी ऐवजी भगवंताचे नाव मुखात असू दे. अहंकार हा अध्यात्मामध्ये फार मोठा शत्रू आहे. त्याला मनात थारा देऊ नकोस.



विवेचन : समर्थांना मानव जातीच्या कल्याणासाठी वाटणारी तळमळ ही एखाद्या मातेसारखी आहे. आपल्या मुलाचे कल्याण व्हावे म्हणून ती त्याला जरी आवडत नसले तरी एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा सांगत असते. त्याचप्रमाणे समर्थ मागील श्लोकातीलच गोष्ट या ठिकाणी पुढे विस्तारून सांगतात. आधीच्या श्लोकात मनाला राघवाशिवाय काही बोलू नकोस कारण व्यर्थ बोलण्यामध्ये सुख नाही असे त्यांनी सांगितले आहे. या श्लोकात हीच गोष्ट ते वेगळ्या शब्दात आपल्याला सांगतात.


भगवंताच्या नामामध्ये अपार सामर्थ्य आहे. शिणलेल्या मनाला शक्ती देण्याचे, उभारी देण्याचे सामर्थ्य त्यात आहे. आपण जर खऱ्या सुखाचा शोध घेत असू तर भगवंताच्या नामाइतके सुख कशातच नाही. अन्य सुखे तात्पुरती आहेत आणि अंतिमतः दुःख देणारीच आहेत हेच समर्थ या श्लोकातून आपल्याला सांगण्याचा प्रयत्न करतात. म्हणून आपल्या जिभेवर नेहमी भगवंताचे नाम असावे असे त्यांचे सांगणे आहे.

शब्द किंवा भाषा बोलणे हे माणसाचे वैशिष्ट्य आहे. भाषेच्या माध्यमातून आपण आपले विचार व्यक्त करतो. शब्दांमध्ये किंवा भाषेमध्ये केवढी शक्ती असते हे जेव्हा आपण उत्तम साहित्यिकांच्या साहित्याचे वाचन करतो किंवा त्यांचे बोल ऐकतो तेव्हा लक्षात येते. बोलण्याला वाचाशक्ती असेही आपण म्हणतो. हे सरस्वतीचे वरदान आहे. पण सर्वसामान्य लोक बऱ्याच वेळा वायफळ बोलण्यात ही शक्ती व्यर्थ घालवत असतात.

पण ज्यांना साधना मार्गावर वाटचाल करायची आहे, भगवंत जोडायचा आहे, त्यांना अशी बाष्कळ बडबड करून चालणार नाही. आपल्या वाचेने त्यांनी भगवंताचे नाम घ्यायला हवे. तशी सवय करायला हवी. उठत बसता, कार्य करता, सदा घेता देता... भगवंताचे नाम मुखात यायला हवे. मी जर साधक आहे आणि भगवंत प्राप्ती हे माझे ध्येय आहे असे जर आपण मनाशी ठरविले असेल तर जनांमध्ये मिसळताना सामान्य माणसांसारखी बडबड करून मला भागणार नाही. तसे केले तर मी माझ्या वाचेची शक्ती व्यर्थ घालवली असा त्याचा अर्थ होईल. **(क्रमशः)**




## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

.

♦चुका♦

मागील अंकावरून......

बऱ्याच वेळा लोक चूक का वागतात, याचे कारण जर शोधले तर तेही आपल्या क्रिये वरील प्रतिक्रिया व्यक्त करीत असतात. म्हणजे त्यांच्या चुका मागे सुद्धा आपलेच कधीचे तरी चूक वागणे हेच कारण असते. म्हणून सत्पुरुष नेहमी चुका शोधताना स्वत: मध्येच शोध घेतात. समोरच्या व्यक्तीत कधीच नाही. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे संत तुकाराम महाराज. एकदा त्यांची म्हैस चोरीला गेली. संत तुकाराम महाराज एक थोर सत्पुरूष होते. त्यांची ही म्हैस चोरीला जावी हे आश्चर्यकारक होते. कारण अशा सत्पुरुषांना त्रास देणार्यांना भगवंत केव्हाच क्षमा करणार नाही ही जवळपास राहणारी सर्व जनता जाणत होती.

जेव्हा प्रपंचाचे एकमेव साधन चोरीला गेले हे तुकाराम महाराजांना कळाले, तेव्हा त्यांनी स्वत:च्या चुका हुडकायला प्रारंभ केला. मी असा काय चूक वागलो असेल की त्यामुळे त्या चोराच्या मनात माझी वस्तू चोरून न्यावी हा भाव निर्माण झाला? कुठेतरी माझेच चुकले असेल. नेमकी काय चूक झाली याचा शोध ते मनोमन सदैव करू लागले. आणि या विचारांच्या गर्तेत त्यांचे तीन दिवस खर्ची पडले. यादरम्यान त्या चोराच्या हे लक्षात आले की आपण चोरून आणलेली म्हैस ही थोर सत्पुरुष संत श्री तुकाराम महाराज यांची आहे. आपल्या हातून ही फार मोठी चूक झाली, म्हणून त्याने अपराधी भावाने तीन दिवसानंतर ती म्हैस त्यांच्या गोठ्यात आणून गुपचूप बांधली.

. क्रमश:..........

## सुविचार - प्रकाश



प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

♦

धैर्याने परिस्थितीचा मुकाबला करा
इच्छाशक्ती येता संबो सतत प्रयत्न करा
परिस्थितीला तुमचा गुलाम करा
चिकाटीने मनोनिग्रहाने यश प्राप्त करा

♦

वेळेचे महत्त्व ओळखून अवांतर गोष्टीत
वेळ खर्च करायचा नाही
क्षणाक्षणाला उद्योगी राहिल्याशिवाय
जीवनात यशस्वी होणे शक्य नाही




## पहाटे तुळशीला पाणी का घालावे?

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आपल्या पुर्वासुरींनी पहाटे प्रत्येकाने तुळशीला पाणी घालावे असे सांगीतले आहे.

त्यामागे पुढील दोन महत्वाची कारणे आहेत.

१) अध्यात्मिक महत्व-

याबाबत पुराणात एक कथा सांगितली जाते.जालिंदर नावाचा एक अत्यंत पराक्रमी राक्षस असतो. आपल्या पराक्रमाच्या बळावर त्याने देवांना आणि साधू-संतांना पार त्राहीत्राही करून सोडलेले असते. त्याला कसे रोखायचे, असा प्रश्न सर्व देवांना पडतो.

मग देव विष्णूला शरण जाऊन

जालिंदरापासून आपले रक्षण करण्याची विनंती करतात.

विष्णूनी जेव्हा जालिंदराबाबत माहिती काढली, तेव्हा त्यांना असे कळते की, त्याची पत्नी वृंदा ही सतीपतीव्रता असते.

तिच्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यांनेच जालिंदर विजयी होत असतो. त्याला पराजीत करायचे असेल, तर वृंदाच्या पतिव्रत्याचा भंग करणे हाच उपाय उरतो. ते करण्यास कुणीही धजावत नाही.

अखेर ती जबाबदारी विष्णू स्वीकारतात. जालिंदराचे रूप धारण करून विष्णू वृंदेच्या महालात जातात. आपले पती आले आहेत असे समजून वृंदा त्यांना अलिंगन देते. तिच्या पतिव्रत्याचा भंग होताच, जालिंदराचा मृत्यू होतो. देवांनी मारलेल्या बाणाने त्याचे शीर तुटते आणि ते वृंदेच्या दारात

पडते. नवऱ्याचे शीर पाहताच वृंदा चकीत होते आणि विष्णूला विचारते, तू कोण आहेस? त्यावर विष्णू आपल्या खऱ्या  रूपात प्रकटतात. संतप्त झालेली वृंदा विष्णूला तू दगड होऊन पडशील आणि मला माझ्या पतीचा विरह तुझ्यामुळे घडला, तसाच तुलाही तुझ्या पत्नीचा विरह सहन करावा लागेल, असा शाप देते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

भगवंत तिची क्षमा मागतात.

तेव्हा वृंदा म्हणते, तू मला आता भ्रष्ट केलेस, आता मला कोण स्विकारील? तेव्हा भगवंत म्हणतात, 'मी तुझा स्वीकार करतो. इतकेच नव्हे तर जे तुझी पूजा करतील त्यांच्यावर माझी कृपा असेल.' त्यानंतर वृंदा सती गेली. पुढे तिच्या शापामुळेच राम अवतारामध्ये भगवंताला सीतेचा विरह सहन करावा लागला.

देव दगड होऊन पडले. त्यालाच 'शालिग्राम' म्हणतात.

ज्या ठिकाणी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले, तिथे तुळशीचे रोप उगवले. तीच ही तुळस. वृंदेच्या नावावरूनच ज्या ठिकाणी तुळस लावली जाते,


तिला 'वृंदावन' असे म्हटले जाते. तीच तुळस कृष्णाने, पांडुरंगानेही धारण केली. तिला भगवंताने स्वीकारले याचे प्रतीक म्हणून 'शालिग्राम' हा जो

दगड आहे, त्याला देव मानून त्याचा विवाह तुळशीसोबत लावला जातो. ती भगवंतांची प्रिय होते, म्हणूनच तिला धारण करणा-यांवर भगवंत प्रेम करतो, अशी श्रद्धा आहे. याच विचाराने वारक-यांनीही तुळशीला आजतागायत पूजनीय मानले आहे.

२) वैज्ञानीक महत्व-

जगातील प्रत्येक वनस्पती दिवसा ऑक्सिजन(२) व रात्री कार्बन डायऑक्साईड (२) सोडते. अपवाद फक्त पिंपळ, कारण पिंपळ रात्रीही ऑक्सिजन सोडतो. **(क्रमशः)**

## लघु बोधकथा



♦उपकार

एका गावात एक श्रीमंत माणूस राहात होता. तो कधीच दानधर्म करीत नसे पण लोक त्याला 'देशभक्त' मानत असत. एकदा तो देवाचे दर्शनासाठी गेला. स्वच्छ हातपाय धुवून दर्शन घ्यावे म्हणून तो नदीवर गेला. हात पाय धुता धुता पाय घसरुन पाण्यात पडला व गटांगळ्या खाऊ लागला. त्याला बाहेर काढण्यास कोणाचाच धीर होईना. तेवढ्यात एका साधूचे त्याचेकडे लक्ष गेले. साधूने त्याला सुखरुप पाण्याबाहेर काढले. साधूला देण्यासाठी त्याने खिशातून खूप पैसे बाहेर काढले पण दिली एक पावली. हे बघून काठांवरच्या लोकांना खूप राग आला.एकाने तर त्याला उचलून पाण्याजवळ नेले व पाण्यात फेकून देऊ लागला हे पाहून साधू म्हणाला "त्याला पुन्हा पाण्यात ढकलू नका, लोकांनो त्याने स्व:ताच्या किंमतीप्रमाणे बक्षीस देण्यासाठी पावली बाहेर काढली.आता गावात त्याला एवढीच किंमत मिळेल. हे ऐकूताच श्रीमंत माणूस खजील झाला.

तात्पर्य:-

उपकार कर्त्याचे उपकार स्मरणे हे आपले परम कर्तव्य आहे.

# वीज कंत्राटी कामगारांना पूर्वीप्रमाणेच बोनस व रजेचे वेतन मिळणार

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – महावितरणचा वीज कंत्राटी कामगारांना आर्थिक दिलासा महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघा कडुन स्वागत महावितरण कंपनीने वीज कंत्राटी कामगारांना पूर्वीप्रमाणेच बोनस व रजेचे वेतन दरमहा अदा करण्याचा निर्णय परिपत्रक काढून घेतला. ही बाब राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मीती मधील वीज कंत्राटी कामगारांसाठी मोठा आर्थिक दिलासा देणारी असून महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने (संलग्न भारतीय मजदूर संघ) या निर्णयाचे स्वागत केले आहे.

महावितरणच्या औद्योगिक संबंध विभागाने दि.२१ एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार नोव्हेंबर २०२५ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील बोनस व रजेचे वेतन एकत्रितरित्या ऑक्टोबर २०२६ महिन्यात देण्याची पद्धत लागू करण्यात आली होती. मात्र कर्मचारी राज्य विमा महामंडळ () व सामाजिक सुरक्षा संहिता २०२० अंतर्गत निर्धारित वेतन मर्यादा रकमेच्या व्याख्येत बदल झाल्यामुळे आता पुन्हा वीज कंत्राटी कामगारांना दरमहा वेतनात बोनस व रजेचे वेतन समाविष्ट करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने या बाबत प्रशासन,केंद्र सरकार, राज्य सरकार व ई.एस.आय कडे मागणी केली होती. तसेच नोव्हेंबर २०२५ मध्ये केंद्रीय कामगार मंत्री मा.ना.मनसुख मांडवीय यांच्या समवेत दिल्ली येथे झालेल्या बैठकीत सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी वेतन मर्यादा वाढवणे बाबत आग्रही मागणी केली होती .

नोव्हेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीतील थकीत बोनस व रजेचे वेतन माहे मे २०२६ च्या वेतनात समाविष्ट करून अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे अनेक महिन्यांपासून कपात झालेली प्रलंबित रक्कम सर्व वीज कंत्राटी कामगारांना परत मिळणार आहे.

संघाच्या पाठपुराव्यामुळे व सातत्यपूर्ण संघर्षामुळे प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतल्याचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी नमूद केले.

संपर्क पोर्टलवर कोर्ट केस कामगारांची नावे स्पष्ट दिसतील प्रमुख नियोक्त्याच्या लेखी सुचने शिवाय कंत्राटदार कामगार कपात करणार नाही, दोषी कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले जाईल असे आश्वासन गुरुवार दि.१६ एप्रिल रोजी राज्य ऊर्जामंत्री मा.मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या बैठकीत होल्डिंग कंपनी संचालक मा.विश्वास पाठक, महावितरण चे संचालक (मा. सं) मा.राजेंद्र पवार व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके यांनी दिले.अध्यक्ष निलेश खरात यांनी आभार मानले. या बैठकीला निलेश खरात, सचिन मेंगाळे, सागर पवार , उमेश आणेराव, राहुल बोडके, अरुण पिवळं व प्रशांत भाम्बुर्डेकर उपस्थित होते.

भारतीय मजदूर संघाचा १६ एप्रिल रोजी मुंबई बांद्रा येथे राज्य व्यापी कामगार आक्रोश मोर्चा झाला या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या सोबत भारतीय मजदूर संघाच्या शिष्टमंडळा सोबत बैठक होणार असल्याची माहिती प्रदेश अध्यक्ष मा.अनिल ढुमणे यांनी दिली आहे.

# सहा ‘‘क’’ कार ‘‘ती’’ च्या साठीच का?

**ज्योतिर्मय साहित्य**

गीता चांगल्या कंपनीत कामाला होती. बऱ्यापैकी पगार. दिसायला फार सुंदर. सावळा रंग, उठावदार हसरा चेहरा, मस्तशी अंगकाठी. गीता एकत्र कुटुंबातील कर्तीसवरती सुन. सासू-सासरे, जाऊ-भाया, चार पुतणे, गीता-राजेश आणि त्यांची दोन मुलं. असं कुटुंब. म्हणतात ना कि, घरातील मोठी व्यक्ती जर समंजस असेल तर घर छान चालतं. पण गीताच्या बाबतीत मात्र असं नव्हतं. गीताची सासू अतिशय तापट, हेकेखोर स्वभावाची. कुठल्याच गोष्टींमध्ये ती गीताची बाजू घेऊन बोलत नसे.



घरातील सकाळची सगळी कामं आवरून गीता ऑफिसला निघायची. ऑफिस मधील जास्तीच्या कामामुळे एखाद वेळ तिला घरी जाण्यास उशीर होत असे. गीता घरी पोहोचली की, उंबरठ्यात पाऊल ठेवताच सासू-सासरे, नवरा, भाया आणि जाऊ गीतावर नको नको त्या असंख्य प्रश्नांचा भडीमार करत असत. उशीर का झाला? इतका वेळ कुठे होतीस? ऑफिस मधून कधी निघालीस? उशीरा घरी येण्याचं कारण काय? तुझा फोन बंद का सांगू लागला? फोन कुठे ठेवला होता? गीतासाठी हे सर्व प्रश्न रोजचे होते. पण दररोजच्या या प्रश्नांना गीता उत्तरे देऊ शकत नव्हती.

यामुळे गीता फार दुखावल्या जायची. नवरा रागाच्या भरात गीताला मारहाण करायचा. सासू शल्य बोचतील असे बोल बोलायची. ऑफिस मधील कामाचा तान, घरच्या जबाबदाऱ्या, नात्यांचं न पेलणारं ओझं. या सगळ्या गोष्टी मुठीत घेऊन ती असह्य वेदना, यातनांचा जीवघेणा प्रवास करीत होती. जेव्हा आपल्याच घरातील व्यक्ती आपल्यावर, आपल्या चारित्र्यावर संशयाचे शिंतोडे उडवीतात तेव्हा खऱ्या अर्थाने आपण आतमधून तुटल्या जातो. हे गीताहुन चांगलं अजून कोणी सांगू शकत नव्हतं. गीता स्वतः ची बाजू मांडत असताना तिच्यावर शाब्दिक वार तर होतच असे. पण शारीरिक, भावनिक, मानसिक रित्या तिला खचवल्या जात होतं.

गीता घरी आल्यानंतर राजेश तिचा फोन चेक करायचा. ‘‘बॉसच्या एवढ्या जवळ का थांबली? किती वेळ होती बॉसच्या केबिन मध्ये?‘‘. ‘‘अहो, कामानिमित्त केबिन मध्ये गेले होते मी. फाईल संदर्भात बोलण्यासाठी. तुम्ही कसलेही प्रश्न का विचारत आहात मला?. संतापाच्या भरात राजेश गीतावर हात उचलत म्हणाला,‘‘ उलट उत्तर नकोय मला‘‘. नशिबाला कोसत गीता तशीच रडत उभी होती. स्पष्टीकरण दिले तरी मारहाण. अशा अवस्थेत होती गीता.





आईच्या उदरातील ‘‘ती‘‘ नऊ महिन्यांचा प्रवास करून बाहेरच्या जगात येते. अगदी तसेच चंद्रावर जाऊन नऊ महिन्यांचा प्रवास करणारीही ‘‘ती‘‘ च आहे. ती सक्षमपणे जेव्हा एखादे काम करीत असते अथवा ती जगण्यासाठी धडपड करीत असते तेव्हा ‘‘ती‘‘ च्या निर्मळ वा कणखर अस्तित्वावर सहा ‘‘क‘‘ काराची प्रश्न शृंखला वा माळ का ओवली जाते?.

आपण पाहतो कि, सहा ‘‘क‘‘ कार घडलेल्या एखाद्या घटनेसाठी वापरले जातात. घटना कधी घडली? का घडली? कशी घडली? घटनेमागचे नेमके कारण काय?. घटनेसाठी तर सहा ‘‘क‘‘ कार वापरलेच जातात. पण ‘‘ती‘‘ च्या बाबतीत मात्र या सहा ‘‘क‘‘ कारांना भलतंच उधाण येतं. ‘‘ती‘‘ स्वैराचाराच्या नाही तर स्वातंत्र्याच्या मर्यादेच्या चौकटीत राहून जगणे जगते. तिलाही तिच्या मनाच्या, बुद्धीच्या, विचारांच्या, भावनेच्या, स्वातंत्र्याच्या, घराच्या आणि तिच्या उंबरठ्याच्या मर्यादा चांगल्या ठाऊक आहेत.

आणि त्या उंबरठ्याच्या मर्यादा सोबत घेऊनच ती स्व-अस्तित्व निर्माण करते आहे. स्वातंत्र्य भारताला मिळाले आहे. स्त्री ला नाही. आजही स्त्री स्वातंत्र्य म्हणजे खुप मोठा गहन प्रश्न आहेच. या प्रश्नाची उकल होणे जरा कठीणच. पुरुष मात्र या सहा ‘‘क‘‘ कारात अडकलेले नसतात. आज घडीला ज्या ज्या स्त्रिया घराबाहेर जाऊन नोकऱ्या करत आहेत. स्वतःच्या अस्तित्वाची एक ओळख निर्माण करीत आहेत. त्याच स्त्रीया ‘‘क‘‘ काराच्या साखळदंडातच जखडलेल्या आहेत. पण खरे पाहता ही केवळ ‘‘क‘‘ कार नसून ‘‘ती‘‘ च्या अस्तिवावर उठवला गेलेला प्रश्न आहे.



# कुलस्वामिनी येथे आशा भोसले यांना श्रद्धांजली ‘‘एक शाम आशा दीदी के नाम’’

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : भारतीय संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या श्रद्धांजली चा कार्यक्रम कुलस्वामिनी प्रतिष्ठान व स्मिता पळसकर संकल्प निशिगंधा पल्लव अंकुर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात आशा भोसले यांच्या अतिशय सुंदर अशा भावपूर्ण गीत‘‘इतनी शक्ती हमे देना दाता मन का विश्वास कमजोर हो ना, भार्गवी देशपांडे व भगूरकर मॅडम यांनी केली. आशा भोसले व महेंद्र कपूर यांच्या आवाजातील आधा है चंद्रमा रात आधी, हे गीत सुभाष पळसकर व श्रीमती भगूरकर यांनी सादर केले. यानंतर सुजाता समर यांनी आयीये मेहरबान हे गीत सादर केले.भार्गवी देशपांडे यांनी रुपेरी वाळूत गीत सादर करून कार्यक्रमात जान आणली, तर मेधा भगूरकर यांनी आज रपट जाये तो हमे ना उठाइए, नवलखा मंगा दे रे,चुरा लिया है तुमने जो दिल को, अशी एकापेक्षा एक गीत करून कार्यक्रमात रंगत आणली. स्नेहा राठोड व गिरीश धूंदे या जोडीने एका पेक्षा एक गीते सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.विशेष हे की ८१ वर्षीय सेवानिवृत्त डिफेन्स अधिकारी श्री हिंगे सर यांनीही दिवाना हुवा बादल हे गीत सादर केले. यावेळी कुलस्वामीनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री विलास कोरडे सौ अलका कोरडे, डॉ. मसलेकर, दत्ता सबनीस, सतीश कल्याणकर आदींची प्रमुख पाहुणे म्हणुन विशेष उपस्थिती होती. लॉन रसिकांनी खचाखच भरून गेलेले होते ,यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री विलास कोरडे व सौ अलका कोरडे यांनी सर्व गायकांचा कुलस्वामिनी तर्फे स्वागत केले व आभार मानले. सर्व उपस्थित रसिकांनी आशा दीदींना श्रद्धांजली वाहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ दिपाली कुलकर्णी यांनी आशा दीदी च्या जीवनावर माहिती देत खुमारसदार रीतीने सादर केले. कार्यक्रम चा समारोप मनजीतसिंग व स्नेहा राठोड यांच्या जाने जा या गीताने झाला.



# आधुनिक भारतासमोरील आव्हाने पुस्तकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** ज्येष्ठ विचारवंत आणि साप्ताहिक ऑर्गनायझरचे संपादक प्रफुल्ल केतकर यांनी आधुनिक भारतासमोरील आव्हाने या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी महत्त्वाचे प्रतिपादन केले. भारतीयांनी आपला आत्मबोध जागृत करून खऱ्या शत्रूबोधाची ओळख करून घेणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या (मएसो) दृक-श्राव्य सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सागर शिंदे, डॉ. पंकज जयस्वाल, रूपाली भुसारी आणि योगेश्वर घोगले यांनी आधुनिक भारतासमोरील आव्हाने या पुस्तकाचे लेखन केले आहे.

केतकर यांनी नमूद केले की, सध्या भारतीयांचा आत्मबोध क्षीण झाला असून त्यांना शत्रूबोधाची जाणीव नाही. इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज आणि चाणक्य यांनाच असा आत्मबोध होता. आजच्या काळात आपला आत्मबोध पक्का करणे आणि समाजाला खऱ्या शत्रूंची ओळख करून देणे हे मोठे आव्हान आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, नेहरूंच्या काळात स्वधर्म, स्वदेशी आणि स्वभाषा या संकल्पना कमकुवत झाल्या होत्या आणि भारतीय असण्याची लाज वाटू लागली होती. मात्र, आता परिस्थिती बदलत आहे. मेरा ही सही हा अभारतीय विचार असून मेरा भी सही हा उदात्त भारतीय विचार आहे. सर्वे भवंतु सुखिन: आणि वसुधैव कुटुंबकम ही मूल्ये केवळ भारतातच जोपासली जातात, असेही त्यांनी सांगितले.

या पुस्तकाची प्रस्तावना लिहिणारे प्रसिद्ध लेखक अभिजीत जोग यांनी यावेळी पुस्तकामागची भूमिका स्पष्ट केली. इतिहास हा संघर्षाच्या विचारधारांमधूनच घडतो, असे ते म्हणाले. एकच विचारधारा उरेल आणि ती राबवता येईल, ही समजूत चुकीची असल्याचे त्यांनी नमूद केले.

जोग यांनी शहरी नक्षलवाद, जागतिक बाजारपेठ व्यवस्था, ख्रिश्चॅनिटी आणि मूलतत्ववादी इस्लाम या चार निरंकुशतावादी शक्तींचा उल्लेख केला. या शक्ती आपापसात स्पर्धक असल्या तरी भारताविरुद्ध मात्र त्या एकत्र येतात, कारण भारताचा विचार त्यांच्या निरंकुशतेला उत्तर देतो, असे त्यांनी सांगितले. या शक्तींचा मुख्य उद्देश प्रत्यक्ष युद्ध नसून अंतर्गत बंडाळी माजवून समाज उद्ध्वस्त करणे आणि राष्ट्र संपवणे हा आहे, असेही जोग यांनी स्पष्ट केले.



# ओळख साहित्यिकांची

## मनोज शोभाबाई प्रकाश अग्रवाल.

पत्ता : रो हाउस नंबर : 3 प्लॉट नंबर: 71. गंगोत्रीनगर देवळाई बीड बायपास विनायक पार्कजवळ, छत्रपती संभाजीनगर-431010.
संपर्क : ९८५०६७८३९५,७२९९०७६९९४.

शिक्षण : एम.ए. (लोकप्रशासन), एम.ए. (शिक्षणशास्त्र), एम.एड., डी.एस.एम.

पद : सहशिक्षक (महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळा सिडको एन-7 छत्रपती संभाजीनगर.)

लेखन कार्य :
- २०११ साली महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित 'लोकचेतना अभियान प्रशिक्षण घटक संच' लेखनात सक्रिय योगदान.
- २०१८ साली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या 'मूठभर गोष्टी' कथासंग्रहामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये कथालेखन.
- २०२० साली छत्रपती संभाजीनगर मनपाद्वारे आयोजित कवी संमेलनात मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांमधून कविता सादरीकरण.
- २०२० साली छत्रपती संभाजीनगर मनपाद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या 'कविता मनामनातल्या पुस्तकात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांमधून कविता लेखन.
- विविध वर्तमानपत्रात (दैनिक लोकमत, पुण्यनगरी, दैनिक सकाळ, आधुनिक केसरी, राजनिष्ठा, दैनिक दिव्य मराठी या वर्तमानपत्रात लेख, कविता, कथा लेखन).
- नाशिक मनपाद्वारे 'जागतिक पर्यावरण दिन' निमित्त आयोजित कविता लेखन स्पर्धेत सहभाग.
- '5 ऑक्टोबर २०२१' रोजी 'चैतन्यवेल' कवितासंग्रह प्रकाशित करण्यात आला.
- ९६ वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन वर्धा या साहित्य संमेलनात कविता सादरीकरण.
- 2026 साली अखिल भारतीय लोककला साहित्य संमेलन नाशिक येथे कविता सादरीकरण.
- छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या शिक्षक साहित्य संमेलनात कथा सादरीकरण.

लेखनासंदर्भात प्राप्त झालेले पुरस्कार :
- 'महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था' कडून 'लोकचेतना अभियान प्रशिक्षण घटक संच' लेखनात योगदान दिल्याबद्दल २०११ साली 'सन्मानपत्र' प्राप्त.
- छत्रपती संभाजीनगर मनपाद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या 'मूठभर गोष्टी' कथासंग्रहामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही भाषांमध्ये कथालेखन केल्याबद्दल 'उत्कृष्ट कथालेखक' म्हणून २०१८ साली 'सन्मान पत्र' प्राप्त.
- छत्रपती संभाजीनगर मनपाद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या 'कविता मनामनातल्या पुस्तकात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांमधून कविता लेखन केल्याबद्दल 'उत्कृष्ट कवी' म्हणून 'प्रमाणपत्र'
- चैतन्यवेल' कवितासंग्रह लिहिल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे 'अभिनंदन पत्र', 'सन्मान पत्र' देऊन सन्मान करण्यात आला.
- चैतन्यवेल' कवितासंग्रहास मैत्रा फौंडेशन बीड यांच्याद्वारे राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार १६/०१/२०२२ रोजी प्राप्त.
- 'वाचनसाखळी समूह महाराष्ट्र राज्य'तर्फे राज्यस्तरीय वाचनयात्री पुरस्कार २०२२.
- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे २०२३ साली उत्कृष्ट मार्गदर्शक पुरस्कार.
- २०२४ साली हैप्पी टू हेल्प फौंडेशनतर्फे राजस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त.
- २०२६ साली दोस्ती फौंडेशनतर्फे राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार.

इतर प्राप्त पुरस्कार :
- 2018 मध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत ऐतिहासिक वारसा स्थळ संवर्धन मोहिमेत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन्मान.
- 2019 मध्ये साहिल बहुद्देशीय फौंडेशनतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त.
- 2020 मध्ये लायन्स क्लबतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त.
- 2022 मध्ये वाचनसाखळी समूहातर्फे राज्यस्तरीय वाचनयात्री पुरस्कार प्राप्त.
- 2023 मध्ये छत्रपती संभाजीनगर मनपातर्फे उत्कृष्ट एजुकेशन मॅटोर पुरस्कार प्राप्त.
- 2024 मध्ये हैप्पी टू हेल्प फौंडेशन तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त.
- 2026 साली दोस्ती फौंडेशनतर्फे राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार.

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे

वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## हे तरंग मी का लिहितो??

कोणत्याही गोष्टीचा सकारात्मक विचार, निरोगी वृत्तीने जीवनातील चढणे ऊतरणे, आव्हाने स्विकारून सामोरी जाणे व आहे त्यात समाधान मानून कार्य करत राहावे, अशी वृत्ती स्विकारली तर "आलीया भोगासी असावे सादर अशी संतवृत्ती येते." याचा अर्थ नकारात्मक पैलूकडे आपण दुर्लक्ष करतो असा नाही. एकाग्रता व विचार यांचे महत्व जीवनात फार आहे, असे मला वाटते!एकाग्रतेने आपले मन शांत, अधिक ऊत्पादक व ऊर्जाक्षम बनते.

तसेच हे विचार लिहिले तर मनाचाही विकास होतो. म्हणून मी हे "सुखाचे तरंग" डायरीत लिहितो. सकारात्मक संकल्प, विचार, ध्येय, बरेवाईट अनुभव तुम्ही लिहा. याचे अजून एक कारण हजारो विचारापैकी जे उपयुक्त असतात ते लिहून न ठेवल्याने विसरून जातात व त्याचा मग आपल्याला ऊपयोग होत नाही व परिणामही दिसत नाही! हे मानसशास्त्रीय दृष्ट्याही योग्य आहे. माझ्या अनुभवानुसार विचारात स्पष्टता येते, तणाव दूर होतो, कोणताही कटूगोड निर्णय घेण्यास मदत होते. तर लेखक, कलाकार, गायक ई.आनंदी व समाधानी राहात असतील का? म्हणून तुम्ही सुध्दा दिवसा आलेले विचार रात्री कागदावर लिहा. हेच विचार मानसिक आरोग्य, आत्मविश्वास वाढविते! म्हणून मी लिहितो, आनंदी राहा, काळजी घ्या गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि वाचत राहा "तरंग माणसा-माणसाचे.






# दवाखाना

## टायफॉईड (२)

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार मैत्रांनो!

आपण टायफॉईड या रोगाविषयी चर्चा करतोय. मराठी भाषेत या आजाराला विषमज्वर असे म्हणतात. मात्र आपल्या मातृभाषेचा असूनही हा शब्द जरा परका वाटतो, कारण तो तितका प्रचलित नाही. टीबीचे ही तसेच, क्षयरोग शब्दाची लिंक लगेच लागत नाही. असो! त्याची कारणमीमांसा इथे करणार नाही. मात्र विषमज्वर या शब्दाचा अर्थ नक्कीच जाणून घेऊ. विषम म्हणजे वाईट. यापूर्वी या तापात रोगी दगावण्याचे प्रमाण फार होते म्हणून हे नाव पडले असावे. याचा असाही अर्थ असू शकतो की यात तापाचा चढ-उतार असतो. मात्र हा तापाचा चढउतार मलेरियाबरहुकूम तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशी ताप चढणे अशा विशिष्ट बंधनात अडकलेला नाही. साल्मोनेला टायफी हे जिवाणू एका मानवापासून दुसऱ्या मानवापर्यंत पोहोचण्यास इतर प्रजातींची गरज नसते. इथे माणूसच माणसाचा वैरी ठरतो. हम तो डूबेंगे सनम, तुमको भी लेकर डूबेंगे हे या विकाराचे मुलभूत तत्व आहे. शौचकर्मानंतर हात स्वच्छ धुणे, ही मूलभूत वैयक्तिक आरोग्यरक्षक स्वच्छतेची गरज आज देखील विस्ताराने सांगायची गोष्ट ठरते, हेच आपले दुर्दैव. मंडळी, योग्य प्रकारे हात धुण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मार्च २०२३ मध्ये सचिन तेंडुलकरला सॅवलॉन स्वस्थ इंडिया मिशन साठी जगातील पहिला हँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित करण्यात आले.

घरचे की दारचे समोसे, घरचा साधा चहा की दारचा प्रेमाचा चहा, या बाबतीत निवडीचा उहापोह न करता साल्मोनेला जिवाणू निरपेक्ष भावाने आपले कार्य करीत असतात. घरची व्यक्ती असो की अन्न तयार करण्याच्या कामात असलेले टायफॉईड मेरी सारखे लक्षणविरहित वाहक स्वयंपाकी असोत, ते त्यांच्या अस्वच्छ हातांनी अन्न दूषित करू शकतात. एखाद्या वाहकाच्या सांडपाण्यामुळे पाणीपुरवठा दूषित झाला, तर त्यातील जीवाणू पाण्यात किंवा सांडपाण्यात चांगले आठवडाभर जिवंत राहतात. सामान्य संपर्कातून याचा प्रसार होत नसला तरी, वाहकाने दूषित केलेल्या पृष्ठभागांना स्पर्श केल्याने, विशेषतः अस्वच्छता असलेल्या घरांमध्ये हे जिवाणू पसरू शकतात. म्हणूनच अन्न हाताळणारे किंवा बालकांचे संगोपन करणारे कर्मचारी वाहक म्हणून विशेषतः धोकादायक असतात, कारण एकच! ते मोठ्या संख्येने लोकांना संक्रमित करू शकतात. त्यांच्यामुळे टायफॉईडची साथ देखील पसरू शकते. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार अंदाजे २% ते ५% टायफॉईड संक्रमित लोक कायमस्वरूपी वाहक बनतात आणि एका







वर्षापेक्षा जास्त काळ त्यांच्या विष्ठेतून किंवा लघवीतून जीवाणू बाहेर टाकत असतात. त्यासोबतच अस्वच्छ स्वच्छतागृहाचा वापर, मानवी मलमूत्राने फलित झालेल्या कच्च्या भाज्यांचे आणि दुधजन्य पदार्थांचे सेवन ही देखील कारणे दिल्या गेली आहेत.


लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

साल्मोनेला टायफी म्हणजेच टायफॉईडचे जिवाणू हे दंडाकृती ग्रॅम-निगेटिव्ह या वर्गवारीत येतात. (मी आधी विशद केल्याप्रमाणे ग्राम स्टेनिंग या विशिष्ट चाचणीद्वारे जिवाणू ग्राम-पॉझिटिव्ह म्हणजेच जांभळे आणि ग्राम-निगेटिव्ह म्हणजे गुलाबी रंगाचे असे वर्गीकृत केल्या जातात). ते चयापचय प्रक्रियेत ऑक्सिजनचा वापर न करणारे असतात. दीर्घकाळ वाहक असलेल्या व्यक्तींमध्ये हे जिवाणू प्रतिकूल वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी स्वतःभोवती एक प्रकारची बायोफिल्म तयार करतात. याप्रकारे त्या व्यक्तीच्या शरीरात टिकून राहत ते एका वर्षापेक्षा जास्त काळ विष्ठा किंवा मूत्राद्वारे शरीराबाहेर टाकले जाऊ शकतात. याचाच संसर्ग इतर मानवांना होतो. साल्मोनेला टायफी फक्त मानवांनाच संक्रमित करतात हे या जिवाणूंचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

प्रसंगानुरूप या जिवाणूंचा सक्रिय अवतार घातक रूप धारण करतो. त्यात विरुलन्स अँटीजेन नावाचे एक पृष्ठभागीय आवरण असते, ज्यामुळे मानवी रोगप्रतिकार प्रणालीचा त्याच्यावर परिणाम होत नाही. मग हा असा सक्रिय जीवाणू थेट मानवी आतड्यांवर आणि रक्तप्रवाहावर परिणाम करतो. साल्मोनेला जिवाणू सर्वप्रथम लहान आतड्यांवर आक्रमण करतात. त्यानंतर या आतड्यांतील रक्तवाहिन्यांद्वारे ते लगेच रक्ताभिसरणात प्रवेश करतात. त्यातील पांढऱ्या रक्तपेशींद्वारे यकृत (लिव्हर), प्लीहा (स्प्लीन) आणि अस्थिमज्जा (बोन मॅरो) मध्ये पोहोचतात. इथे स्वस्थ बसतील तर ते घातक साल्मोनेला कसले? जिथे म्हणून ते जातात तिथे त्यांचे बहुगुणन (मल्टिप्लिकेशन) ठरलेलेच असते. मग नव्या दमाचे हे सैनिक वजा जिवाणू रक्तप्रवाहात प्रवेश करतात. या टप्प्यावर रोग्यास तीव्र ताप आणि पोटदुखीसारख्या या आजारात नेहमी आढळणारी लक्षणे दिसायला लागतात. पित्तविषयक प्रणाली, आतड्याची लिम्फॅटिक ऊतक आणि पित्ताशय या सर्वांना हे जिवाणू असे कांही घेरतात की हतबल रोग्याला स्वतःचे शरीर त्यांच्या उपभोगासाठी उपलब्ध करण्यावाचून गत्यंतर नसते.

टायफॉईडची लक्षणे बहुदा सहसा संसर्ग झाल्यानंतर १ ते ३ आठवड्यांनी दिसू लागतात. त्यातील प्रामुख्याने दिसून येणारी लक्षणे:

उच्च ताप: हळूहळू ताप वाढतो, जो काही दिवसांत १०३-१०४पर्यंत पोहोचू शकतो. हे प्रमुख लक्षण आहे, ताप आल्यावर कोरडा खोकला येणे.

तीव्र डोकेदुखी, स्नायूंमध्ये तीव्र वेदना, प्रचंड थकवा आणि अशक्तपणा जाणवणे.

तीव्र पोटदुखी आणि पेटके येणे, पोट फुगणे, मळमळ, उलट्या

बद्धकोष्ठता किंवा अतिसार: सुरुवातीला बद्धकोष्ठता आणि नंतरच्या टप्प्यात अतिसार होऊ शकतो.

या सोबतच इतर लक्षणे वेगवेगळ्या प्रमाणात आढळून येतात-

भूक न लागणे आणि वजन कमी होणे,

गुलाबी पुरळ (रोझ स्पॉट्स): छाती किंवा पोटावर लहान गुलाबी रंगाचे चट्टे दिसणे. गडद त्वचेवर हे कधी कधी दिसून येत नाहीत. हृदयाचे ठोके कमी होणे


टायफॉईडच्या गंभीर वळणाविषयी पुढील भागात जाणून घेऊ.

## मँगो डिझार्ट बाईट

**ज्योतिर्मय साहित्य**

आता उन्हाळा सुरु झाला . कैऱ्यांच्या बरोबरच आंबेही बाजारात येण्यास सुरुवात झाली. फळांचा राजाच तो, स्वागत सुद्धा सर्वजण तितक्याच प्रेमाने करतात. वर्षभर वाट पाहिल्यावर आलेला असतो ना,मग आल्यावर अगदी रसपासून ते आंबा आईस्क्रीम,कुल्फी, मस्तानी,साटे, मावा,वड्या तर बनवून हौसेने सारेजण खातातच,पण हौशी आणि मनापासून

याच्यावर प्रेम करणारे लोक नवनवीन पदार्थ शोधून बनवून खातात,पार्ट्या देतात. अगदी आमरस पुरणपोळी पार्ट्या तर होतातच,पण आंब्याचा भात, विविध डिझार्ट्स अगदी मनापासून बनवून मनसोक्त ताव मारतात. आज आपण थोडेसे मजेशीर डिझर्ट बनवायचे का? हे पाहून सारेच एकदा तरी नक्कीच करून पाहू म्हणणार आणि एकदा बनवल्यावर,टेस्ट केल्यावर सिझन संपेपर्यंत बनवणार,खाणार, सर्वांना उत्साहाने खिलवणार हे नक्की!...



साहित्य -

६ हापुसचे मोठ्या आकाराचे आंबे, १ लिटर दूध,१ चमचा मँगो कस्टर्ड पावडर, अर्धी वाटी साखर,१चमचा दुधमसाला, २ चमचे मिल्क पावडर, २ चमचे ड्राय फ्रुट्सचे पातळ काप.




कृती - प्रथम पाव कप दूध बाजूला ठेवून बाकीचे दूध उकळण्यास गॅसवर ठेवावे. बाजूला ठेवलेल्या दुधात कस्टर्ड पावडर मिक्स करून घ्यावी. आता त्यातच पाव कप पाणी घालून मिल्क पावडर पण व्यवस्थित मिक्स करावी. थोडे सैलसर असले म्हणजे गुठळ्या होत नाहीत. दूध चांगले उकळायला लागल्यावर ७..८ मिनिटे मध्यम आचेवर मधून मधून ढवळत आटवावे.

आता त्यात दूध मसाला,ड्राय फ्रुट्स घालून व्यवस्थीत ढवळावे. नंतर गॅस थोडासा बारीक करून त्यात कस्टर्ड पावडर,मिल्क पावडर मिक्स केलेले दूध त्यात सावकाशपणे घालावे. हे सतत ढवळत राहावे म्हणजे त्यात गुठळ्या होत नाहीत.आता हे एकदम झटपट आटून घट्ट होते.हे थंड होण्यास ठेवावे.

त्यानंतर आंबे स्वच्छ धुवून पुसून घ्यावेत. वरचे देठ व त्याच्या बाजुचा मोठ्ठा गोल भाग धारदार सुरीने कापावा. तो वर पुन्हा ठेवायचा आहे हे लक्षात ठेवून तो त्याच आंब्याजवळ ठेवावा. आता सुरीने आतील कोय गोल फिरवत अलगद काढून घ्यावी. आता आतून कोय गेल्यामुळे पोकळ जागा झाली असेल त्यात हे थंड झालेले आईस्क्रीम सारखे घट्ट झालेली रबडी घालावी व त्यावर सुरीने काढलेले देठासोबतचे झाकण ठेवावे.सर्व आंबे असे भरून झाले की ते फ्रीझर मध्ये सेट होण्यासाठी ठेवावेत. साधारण ७..८ तासात आतील रबडीचे मस्त आईस्क्रीम बनून सेट होते.मग ते बाहेर काढून आंबा बाहेरून एकदम कडक झालेला असेल.सालकाढणीने आंब्याची

साल काढावी व त्याच्या सुरीने चकत्या कट करून घ्याव्यात. आता आपले हे हटके डिझार्ट रेडी आहे. सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून आवडत असेल तर त्यावर टुटीफ्रूटी,स्प्रिंकलर्स किंवा पिस्ते घालून थंडगार सर्व्ह करावे.


वैशिष्ट्य:


हे डिझार्ट दिसायलाच इतके आकर्षक आहे की आधी डोळ्यांनी मन तृप्त होते. आंबा,रबडी कुल्फीचे कॉम्बिनेशन तर इतके लाजवाब लागते की केलेल्या परिश्रमाची पुरेपूर सार्थक

झाल्याची फडशा पडताच जणू पावतीच मिळते


उन्हाळा नको रे बाबा म्हणणारे, आता उन्हाळा संपूच नये असे म्हणायला लागतील पहा!


## कवितेच्या लाटावर...










## कवितेच्या लाटावर...





हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# अनुभवाचे बोल सांगणारा...‘‘गाथा एक नाथा’’

ज्योतिर्मय साहित्य

ज्येष्ठ लेखक कवी एकनाथ देशमुख यांचा काव्यप्रवास १९७२ पासून ‘‘ओळखी अनोळखी‘‘ या काव्यसंग्रापासून सुरू झाला. त्याला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. काही मासिके, वृत्तपत्रातून कविता प्रसिद्ध होत होत्या. त्यावेळेला ते महाविद्यालय शिक्षण घेत होते. त्यानंतर तब्बल २५ वर्षांनी म्हणजे १९९७ साली ‘‘इंद्रधनू च्या जखमा‘‘ हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला, आणि त्यानंतर जवळपास २८ वर्षांनी गाथा एक नाथा‘‘ हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. या संग्रहाच्या आधी मध्यंतरीच्या काळात त्यांनी ‘‘जग नावाचा अंधार‘‘ नाटक लिहिले आहे. ‘‘गाथा एकनाथा‘‘ संग्रह म्हणजे त्यांच्या साहित्य प्रवासाचे तसेच संसार वारीतल्या आयुष्याचे सिद्ध दर्शन आणि आलेले अनुभव असे जरी म्हटले तरी चालेल. आपल्या पहिल्याच कवितेत ते म्हणतात...

वय बदलते तशी कविता
अनुभवाचे बोलच बोलते कविता !


हा संग्रह शब्द कविता, परिवर्तन, संदर्भ, संसार वारी, आणि परमार्थ अशा पाच विभागात विभागला आहे. संग्रहात एकूण १२५ कविता आहेत.

या संग्रहात केवळ पारंपारिक भक्तीच नाही, तर समाजातील विसंगती, ग्रामीण जीवनातील कष्ट आणि सामान्य माणसाच्या संघर्षाला वाचा फोडणाऱ्या कवितांचा समावेश आहे.

शब्द कविता...

वय बदलते तशी कविता
अनुभवाचे बोलच बोलते कविता !


अगदी खरं आहे! अनुभवाच्या शाळेत जसे धडे मिळत जातात, तशी शब्दांची धार आणि कवितेचा अर्थही बदलत




जातो.ओळींतून परिपक्वता जाणवते. सुरुवातीला कविता कदाचित केवळ कल्पनांवर आधारित असते, पण जसजसं वय आणि अनुभव वाढतात, तशी ती जीवनाचं सत्य मांडू लागते. देशमुखांची ही रचना अनुभवाचे बोल अगदी अचूक मांडते.

संसाराच्या राम रगाड्यात
मुलाबाळात नात्या गोत्यात विसरला गेलो
ओळख आता माझी माझ्याशी
मन भरून काळजाची अख्या जन्माचा बोललो
लिहिता लिहिता वही गच्च भरली
आनंद असा की ज्ञानेश्वरी लिहिली
जसे भोगले अनुभवले तसे लिहीत राहिलो
कर्माची पक्की दस्तऐवज गोळा करीत गेलो
कधीतरी वरती चालणार खटला
पुरावा म्हणून कविता अन–
साक्षीदार असेल शब्दांचा गोतावळा.

ओळी अतिशय सुंदर आणि अर्थपूर्ण आहेत. अनुभवांना शब्दांत मांडून आयुष्याचा हिशोब मांडण्याची ही पद्धत मनाला भिडणारी आहे. गाथा एक नाथाची अनुभवांची शिदोरी आहे. जे काही वाट्याला आले, ते प्रामाणिकपणे कागदावर उतरवलेआहे. कविता म्हणजे केवळ शब्द नसून, ते तुमच्या कर्माचा आणि जगण्याचा जिवंत पुरावा आहेत. अर्थातच कर्माचा दस्तऐवजच आहे. जेव्हा आयुष्याचा प्रवास संपवून ‘‘वरती‘‘ जाण्याची वेळ येईल, तेव्हा हेच शब्द, गोतावळा तुमच्या अस्तित्वाचे साक्षीदार म्हणून उभे राहतील. शब्दांना साक्षीदार मानणे ही कल्पना खूपच सखोल आहे. एखाद्या संवेदनशील कवीचे मनच असा विचार करू शकते.




परिवर्तन : परिवर्तन हा आपल्या आयुष्याचा भाग आहे. अर्थातच ते परिवर्तन शब्दातून कवितेत उतरले नाही तर नवलच.

तेव्हाच जगणं हे खऱ्या अर्थाने जगणं होतं
पंख खूप विशाल तर आकाश छोटं होतं
पानगळीत नग्न झालेले झाड ऋषीमुनी होती
बहराचा कहर तर उत्सवातील तपस्वी माती
शेतीवाडीची अशी दाणाफान झाली
मधाळ आठवणी जपणाऱ्या खुणांची पार वाट
लागली....

कविता खूपच अर्थपूर्ण आणि काळजाला भिडणारी आहे. निसर्गातील बदल आणि माणसाची बदललेली जीवनशैली यांतील विरोधाभास खूप प्रभावीपणे मांडला आहे. विशाल पंख आणि छोटं आकाश हे माणसाच्या एकेकाळच्या उत्तुंग ध्येयांचे आणि अफाट हिमतीचे प्रतीक आहे. जेव्हा जिद्द मोठी असते, तेव्हा आभाळही ठेंगणे वाटते. ऋषीमुनींसारखी झाडं पानगळीच्या काळात सर्वस्वाचा त्याग करून शांत उभं राहलेलं झाड एखाद्या तपस्व्यासारखं वाटतं, जे पुन्हा बहरण्याची शांतपणे वाट पाहत असतं. जेव्हा निसर्ग बहरतो, तेव्हा त्या सौंदर्याच्या मागे मातीची वर्षानुवर्षांची तपश्चर्या आणि सोसणे असते. शेतीची दाणादाण आणि हरवलेल्या आठवणी, प्रगतीच्या नावाखाली किंवा बदलत्या काळामुळे निसर्गाचा जो ऱ्हास झाला आहे, त्याबद्दलची ही खंत आहे. जुन्या मधाळ खुणा आणि आठवणी आता नष्ट होत चालल्या आहेत, हे दुःख यात स्पष्ट जाणवते. देशमुखांच्या शब्दांतून निसर्गाप्रती असलेली ओढ आणि काळाच्या ओघात हरवलेल्या समृद्धीबद्दलची हुरहूर दिसून येते.

(क्रमशः)




# उन्हाळी शिबिराचा मुलांनी लुटला आनंद

ज्योतिर्मय साहित्य

पिंपळे सौदागर – येथील एक्सलंट ज्युनिअर प्रीस्कुलमध्ये नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या मोफत उन्हाळी शिबिराचा लहान मुलांनी आनंद लुटला. उन्नती सखी मंच सदस्यांच्या मुलांचा सहभाग असलेल्या या शिबिरात वयवर्ष दोन ते सहा आणि सहा ते बारा अशा दोन गटात झालेल्या या शिबिरात मुलांना नृत्य, पपेट शो, हस्तकला, योगा, ध्वनीशास्त्र, संवादकौशल्य याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उन्नती सखी मंचच्या अध्यक्षा आणि नगरसेविका डॉ. कुंदा भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरासाठी उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे आणि त्यांच्या टिमने विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. शेषराव पाटील यांच्या रानफुले काव्यसंग्रहाचे प्रकाशन

## कवितेतून पर्यावरण संवर्धनाची दृष्टी मिळते-डॉ. विठ्ठल वाघ

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे–** पुणे येथे सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. शेषराव पाटील यांच्या रानफुले या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. यावेळी ज्येष्ठ कवी डॉ. विठ्ठल वाघ यांनी कवितेतून पर्यावरण संवर्धनाची दृष्टी मिळते, असे मत व्यक्त केले. जागतिक वसुंधरा दिवस आणि जागतिक पुस्तक दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

साहित्यविश्व प्रकाशनने वनभवन, गोखलेनगर येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले होते. पुणे वनवृत्त (प्रा) पुणेचे वनसंरक्षक आशिष ठाकरे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. सेवानिवृत्त मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, प्रभावती वाघ, उपवनसंरक्षक पंकज गर्ग, कवी डॉ. शेषराव पाटील, वर्षा शेषराव पाटील, प्रकाशक विक्रम मालन आप्पासो. शिंदे आणि रामदास पुजारी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. विठ्ठल वाघ यांनी यावेळी बोलताना सांगितले की, कविता वाचकांना डोळस बनवते आणि शुद्ध सर्जनशील विचार मानवाला नवीन दृष्टी देतो. जल, जमीन आणि जंगल वाचवण्याची आज गरज निर्माण झाली आहे. पुढच्या पिढ्यांना मोकळा श्वास देण्यासाठी पर्यावरणातील घटकांचे जतन करणे महत्त्वाचे असून, यासाठी प्रबोधन आवश्यक आहे.



कविता हे प्रबोधनाचे प्रभावी माध्यम ठरते. डॉ. शेषराव पाटील यांची पर्यावरणावरील कविता आधुनिक काळातील वनाचे श्लोक असून ती निसर्गाचे महत्त्व दर्शवते.

काव्यसंग्रहाचे लेखक डॉ. शेषराव पाटील यांनी रानफुले मध्ये पर्यावरणातील अनुभव, निरीक्षणे, गरजा, उपाय आणि संवर्धनाचे संचित मांडले असल्याचे सांगितले. पर्यावरण जनजागृती हा विचार घेऊन अनेक कविता लिहिल्याचे त्यांनी नमूद केले.

रंगनाथ नाईकडे म्हणाले की, झाडे आणि वने ही वसुंधरेची कवचकुंडले आहेत. मानव आपल्या स्वार्थासाठी वृक्षतोडीतून पर्यावरणाचा नाश करत आहे. वसुंधरा वाचवण्यासाठी वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन हा एकमेव उपाय आहे. पंकज गर्ग यांनी अलीकडे मानवी समाजात लिखाणाचे प्रमाण कमी झाल्याने लोकांची एकाग्रता कमी होत असल्याचे मत व्यक्त केले. लिहिणे, वाचणे आणि लिखाणाचे दस्तऐवजीकरण या आपल्या मूलभूत सवयी झाल्या पाहिजेत, असे ते म्हणाले.या कार्यक्रमात डॉ. विठ्ठल वाघ यांनी शेती आणि मातीवरील अनेक कवितांचे

# शेखचिल्ली

ज्योतिर्मय साहित्य

शेखचिल्ली म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर येतो तो हवेत किल्ले बांधणारा, स्वतः बसलेली फांदीच तोडणारा एक विनोदी आणि मूर्ख माणूस. लहानपणी त्याच्या गोष्टी ऐकून आपण खूप हसायचो. पण आज भोवतालच्या निसर्गाकडे बघताना, जाणवतं की, आपण सारेच जण आधुनिक युगाचे हाय–टेक शेखचिल्ली झालो आहोत. फरक फक्त एवढाच की, तो फांदी कापायचा आणि आपण पूर्ण जंगलंच साफ करत आहोत.

त्या जुन्या गोष्टीत शेखचिल्ली ज्या फांदीवर बसला होता, तीच तोडत होता. त्याला वाटलं नव्हतं की फांदी तुटली की आपणही पडणार आहोत. आज आपणही अगदी तेच करतोय. ज्या निसर्गाने आपल्याला श्वास दिला, पाणी दिलं आणि जगण्यासाठी आधार दिला, त्याच निसर्गाच्या मुळावर आपण उठलो आहोत.

हिरव्यागार वनराईला कापून आपण तिथे सिमेंटचे मनोरे उभे केले.

ज्या नद्यांना आपण माता म्हणतो, त्यातच आपण शहराचं सांडपाणी आणि कारखान्यांचे विष सोडतोय.

शुद्ध हवेची जागा आता धुराने घेतली आहे. होम किंवा चुलीचा धूर असेल तर प्रदूषण म्हणून ओरड होते. पण अफाट वाढलेल्या गाड्यांमधून निघणाऱ्या घातक धुराचे काय? साड्या बऱ्याच ठिकाणी गाड्यांच्या धुरामुळे होणारी प्रदूषण पातळी मोजण्याची साधने बसवलेली असतात. प्रदूषण वाढले की त्यातून रंगीत धुक्या सारखा धूर बाहेर पडतो. हे सगळीकडे बघून मला वाटले होते, हे असेच शोभिवंत दिसण्यासाठी बसवले आहे. नंतर जेव्हा याचे कारण शोधले, त्यावेळी ते प्रदूषण पातळी दर्शवते हे समजले. कारण ते जिथे जिथे बसवलेले आहे, त्या ठिकाणी कायमच रंगीत धूर सोडत असते.


आपल्याला वाटतंय की आपण प्रगती करतोय, पण प्रत्यक्षात आपण त्या फांदीवर बसून कुऱ्हाडीचे घाव घालत आहोत, जी आपल्याला सावरून धरतेय.

शेखचिल्लीकडे तरी विचारांची कमतरता होती. पण आपल्याकडे तर विज्ञानाची ताकद आणि बुद्धीची प्रगल्भता आहे. तरीही आपण निसर्गाला ओरबाडण्यात मागे नाही.

जेव्हा उन्हाळ्यात पारा ४५ अंशांच्या पार जातो, तेव्हा आपण एसीच्या थंड हवेत बसून ग्लोबल वॉर्मिंगवर चर्चा करतो. पण घराबाहेर एक झाड लावण्याचे कष्ट घेत नाही. उलट ज्यांच्या दारात झाडे आहेत त्यांच्याच मागे ‘‘झाडे तोडा, कचरा होतोय‘‘ असे म्हणत त्रास देत आहेत.

टँकरच्या रांगा पाहून आपल्याला काळजी वाटते, पण पावसाचं पाणी जमिनीत मुरवण्यासाठी आपण जागाच शिल्लक ठेवली नाही. जमिनीला सिमेंटने पूर्णपणे पॅक करून टाकलं आहे.

असे आधुनिक शेखचिल्ली विविध रूपात आपल्याला दिसतात. ते फक्त निसर्गा कडून घेतात. देत मात्र काहीच नाहीत.



त्यात प्लॅस्टिकचा अमर्याद वापर करणारे आहेत. त्यामुळे पृथ्वीला गुदमरून टाकत आहोत.

त्याचे तोटे आपण अनुभवत आहोत. तरीही सावध होत नाही.


विविध मॉल, मोठ्या इमारती बांधण्यासाठी झाडे तोडत आहोत. विकासाच्या नावाखाली टेकड्या फोडल्या जात आहेत.

नाद्यांचे पाणी प्रदूषित करत आहोत. नदीत कचरा टाकू नये हे खरे तर कळायला हवे. परंतु ज्या नद्यांवर कचरा टाकू नये म्हणून जाळ्या बसवलेल्या असतात तेथे लोक गाडयांवर उभे राहून प्लॅस्टिक पिशवीत आणलेला कचरा व्हॉली बॉल प्रमाणे नदीत फेकतात.

नदीत रसायनयुक्त पाणी सोडतात. यात आपलेच नुकसान होत आहे.

विविध कीटक नाशके घरात, परिसरात वापरून निसर्गातील अन्न साखळीवर परिणाम होत आहे. कीटक अभ्यासक कायम सांगत असतात, कोणतेही किडे मारू नका. तर ते निसर्गात सोडा. ते अन्नसाखळीचा घटक असतात. पण आपण हायजीन म्हणून इतक्या अतिरेकी खुळचट कल्पना बाळगून स्वतःचे नुकसान करुन घेत आहोत.

नैसर्गिक साधन संपत्तीचा अमर्याद उपसा करत आहोत.




‘‘निसर्ग प्रत्येकाची गरज पूर्ण करू शकतो, पण कोणाचाही हव्यास पूर्ण करू शकत नाही.‘‘ असे महात्मा गांधी म्हणायचे.

जर आपण वेळीच सावध झालो नाही, तर शेखचिल्लीप्रमाणे जमिनीवर आदळणं अटळ आहे. आज आपण निसर्गाचा जो नाश करतोय, त्याची परतफेड उद्याच्या पिढीला करावी लागणार आहे.

झाडे लावा, झाडे जगवा: हे केवळ घोषवाक्य नसून ती काळाची गरज आहे.

प्लॅस्टिकचा वापर टाळणे आणि कचऱ्याचे व्यवस्थापन करणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे.

मी जोडलेल्या इमेज मध्ये इतर शेखचिल्ली आहेत. आणि झाडावर बसून योग्य दिशेने फांदी तोडणारा मात्र शहाणा शेखचिल्ली आहे. तो जरी पडणार नसेल तरी उडणारा पक्षी त्याला झाड न तोडण्याची विनंती करत आहे. आणि ‘‘तू पडणार नसलास तरी आमचे आणि पर्यावरणाचे नुकसानच करत आहेस. म्हणजे तोही एक शेखचिल्ली विचारच आहे. कोणाचे तरी नुकसान आहेच.‘‘

एकमेकांचे बघून थांबवायचे सोडून हे प्रमाण वाढतंच आहे. काही गोष्टींवर आमच्या घरातील लोक काही उपाय करत असतो. त्यावेळी आपल्या एकट्याने करुन काय होणार? असा विचार करत नाही.

जसे – नदीत कचरा टाकणाऱ्याला म्हणतो, दादा तो कचरा इकडे द्या. मी माझ्या गाडीवर नेऊन कचरा पेटीत टाकते. काही जण खजिल होतात. व कचरा टाकत नाहीत. पण काही जण खरंच त्यांचा कचरा देतात.

प्लॅस्टिक पिशवी साठी कायम नकार देतो. कोणाकडूनच घेत नाही. घरात ऐवजी एझॉस्ट फॅन बसवायचे. आपण काही छोटे छोटे उपाय करु शकतो. दारातील झाडे तोडण्यासाठी बरेच जण मागे लागत असतात. आमच्या दारात कचरा येतो म्हणतात. त्यांना मी स्पष्ट नकार देते. आणि झाडे तोडल्यास तक्रार करेन म्हणून विरोध करते.

निसर्ग ही उपभोगण्याची वस्तू नसून ती जपण्याची संपत्ती आहे. कोणी झाडे तोडताना दिसले की ती व्यक्ती मला पाठीवर ऑक्सिजन सिलेंडर व तोंडाला ऑक्सिजन मास्क लावलेली दिसू लागते. आणि झाडांपासून फुकट मिळणाऱ्या ऑक्सिजनचे सिलेंडर रूपात पैसे भरताना दिसते.

शेखचिल्लीच्या गोष्टीचा शेवट त्याच्या पडण्याने होतो. पण मानवाच्या या निसर्गविनाशक गोष्टीचा शेवट विनाशाने होऊ नये असं वाटत असेल, तर आपल्याला आपली कुऱ्हाड खाली ठेवावी लागेल. निसर्गाची फांदी तोडण्यापेक्षा ती कशी बहरता येईल, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

लक्षात ठेवा, निसर्ग वाचला तरच आपण वाचू. अन्यथा, इतिहासाच्या पानात आपण सर्वात हुशार पण सर्वात मूर्ख शेखचिल्ली म्हणून ओळखले जाऊ !



# आजीची गोष्टरूपी शिकवण



राजू आणि संजू दोन जुळे भाऊ, जेमतेम ७ वर्षाचे घरात ते दोघे, त्यांची आई आणि आजी रहात असे त्यांचे बाबा देशाच्या संरक्षणासाठी सीमेवर सैनिक म्हणून कार्यरत होते. आजी रोज रात्री झोपताना दोन्ही जुळ्या नातवांना छान छान गोष्टी सांगत असे आणि राजू आणि संजू आजीला वेगवेगळे प्रश्न विचारून आजीला त्रस्त करत असत.पण आजीला त्याचा आनंद होता. दोघेही दुसरीला होते. एके दिवशी वर्गात राजुला बेंचवर बसण्या वरून कुणीतरी शिवी दिली, मूर्ख कुठला म्हणून. संजुला मग राग आला माझ्या भावाला मूर्ख म्हणाला म्हणून त्या दुसऱ्या मुलाला तो ही मूर्ख म्हणाला. इतक्यात गुरुजीं वर्गात आले आणि पोरं आपआपल्या जागेवर गुपचुप जाऊन बसले.

घरी गेल्यावर राजूने ही घटना आजीला सांगितली. आजी म्हणाली, मूलांनो कधीच कुणाला वाईट बोलायचे नाही किंवा शिवी दयायची नसते. मग संजू म्हणाला,आजी का? आम्हाला तो मुलगा काहीही म्हणत होता. आजी दोघांना म्हणाली, मुलांनो या इकडे बसा माझ्याजवळ. राजू आणि संजू आजी जवळ येऊन बसले.आजी म्हणाली, राजू तू एका ग्लासमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी भरून आण आणि संजू तू दुसऱ्या ग्लास मध्ये शुद्ध पाण्यात आपल्या बागेतील माती टाकून तो ग्लास आण.

दोघांनी त्या त्या प्रमाणे केले. नंतर आजी म्हणाली,संजू तुझ्या ग्लास मधील पाण्यात माती आहे, चमचाने ते पाणी ढवळ म्हणजे माती पाण्यात विरघळून जाईल. संजू ने तसे केले आणि म्हणाला, आजी हे पाणी आता खूप गढूळ झाले आहे.आजी म्हणाली आता आता दोघे आपले आपले पाण्याचे ग्लास घेऊन माझ्या जवळ बसा, आणि राजुला म्हणाली राजू, तुझ्या शुद्ध पाण्यातील एक चमचा पाणी संजुच्या ग्लास मधील पाण्यात टाक. राजू ने तसे केले तेंव्हा आजी म्हणाली, ते गढूळ पाणी स्वच्छ झाले का? राजू म्हणाला, नाही आजी फार काही फरक नाही ते गढूळच आहे. आजी नंतर संजुला म्हणाली, आता तू त्या चमच्याने एक चमचा गढूळ पाणी राजू जवळ असलेल्या शुद्ध पाण्याच्या ग्लास मध्ये टाक. संजुने तसे करताच शुद्ध पाणी थोड्या प्रमाणात गढूळ झाले. दोघेही भाऊ एकदम म्हणाली, आजी चांगलं पाणी खराब झाले ना? तेव्हा आजी म्हणाली, हुं, मुलांनो असेच असते आयुष्य. एखादी वाईट शिवी किंवा वाईट वागणूक चांगल्या मुलाला वाईट ठरवू शकते. पण चांगल्या व्यक्ती मधील एखादा चांगला गुण वाईट जो मुळात वाईट व्यक्ती आहे त्याला लगेच चांगले करू शकत नाही. म्हणून नेहमी चांगले वागावे चांगले बोलावे ,काही प्रश्न किंवा अडचणी असल्यास आपल्या आई बाबा किंवा गुरुजींना विचाराव्यात आणि नीट समजून त्या प्रमाणे वागावे. भांडण,तंटा, मारामारी करू नये.

आजीने सांगितलेल्या गोष्टीने दोन्ही भाऊ आनंदी झाले आणि एका आवाजात म्हणाली, आजी आम्ही कधीच कुणाला वाईट बोलणार नाहीत.

बोध:- चांगल्या मुलाला एखादा वाईट गुण ही वाईट बनवू शकतो पण मुळात वाईट असलेल्या मुलाला एखादया चांगल्या गुणाने चांगुलपणा मिळत नाही


**गिरीश खं.वसेकर,**
नांदेड सिटी,पुणे मोबाईल : ९४२२६५९४००

# निसर्गाची जादू

इरा आज आई जवळ हट्ट धरून बसली... आई आपण एक पोपट आणून आपल्या बाल्कनीत ठेवू . इराला पोपट फार आवडायचा...त्याचे लाल डोळे आणि लाल चुटुक चोंच,त्याचा हिरवा रंग तिला भुरळ पाडायचा. आणि म्हणूनच तिला तो सतत सोबत असावा असे वाटायचे. इरा,चल आपण जवळच्या बागेत जाऊन छान छान गंमत बघू या.. इराच्या बालमनाला वाटले, अजून काय काय असेल बरं त्या बागेत?

इराची आई इराला घेऊन जवळच्या बागेत गेली. त्या बागेत खूप सुंदर फुले असलेली झाडे होती. त्यावर लाल, पिवळी, निळी, हिरवा, जांभळी, सोनेरी आणि केशरी अश्या विविध रंगांची फुलपाखरे फुलांभोवती फिरताना दिसली. तिच्या बालमनाला वाटले ती फुलपाखरं आनंदाने छान इकडून तिकडे बागडत आहेत. स्वच्छंदी खेळत आहेत.

इरा त्यांच्याकडे बघतच राहिली...तिथले वेगवेगळे रंग पाहून ती हरखून गेली. मन लावून फुले आणि फुलपाखरे पाहू लागली. फुलांचे ते वेगवेगळे आकार, रंग, पाकळ्यांचे वेग वेगळे रूपं बघुन तिला जाम मजा वाटत होती. तेव्हा ती आईला म्हणाली.. आई ,ही फुलपाखरं पकडा पकडी खेळत आहेत ना? केवढी मस्ती करताहेत त्यांना कोणी रागावत सुद्धा नाही..



आणि हसतच म्हणाली मज्जा आहे बुवा त्या फुलपाखरांची... तिच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

इराची आई इराला म्हणाली, अगं इरा.. ती फुलपाखरं त्या फुलात असलेली मध खात आहेत. तुला जसं गोड गोड लाडू, वडी,चॉकलेट असं सारं गोड आवडतं ना तसंच या फुलपाखरांना ही आवडतं. ये तुला दाखवते... असे म्हणून इराची आई इराला एका फुलाच्या जवळ घेऊन गेली... हे बघ इरा फुलांचा हा मधला पिवळसर भाग असतो ना त्यात खूप गोडगोड मध लपलेला असतो आणि तो या फुलपाखरांना खूप खूप आवडतो आणि म्हणून... तो खाण्यासाठी त्याचा एवढा दंगा चाललेला आहे.

हो का!! बरं बरं! म्हणून त्यांची भांडाभांडी चालू आहे तर..

मी आणि दादा जसे आईसक्रीम साठी भांडत असतो तसेच ना? इराला हसू आवरेना ..ती हसू लागली.... तिला फुलपाखरा विषयी नवल वाटलं,कौतुक ही वाटलं .

इराची आई इराला म्हणाली, इरा चल आता आपण पुढे जाऊ ...

बागेत सगळीकडे हिरवे वेगवगेळी झाडी आणि त्यावर सुंदर सुंदर फुलं दिसत होती. तिथेच चालताना एक झुडुपाला इराच्या पायाचा धक्का लागला आणि नेमकं ते इराच्या लक्षात आलं...तिने लगेच आईला प्रश्न विचारला, आई अगं हे झाड बघ ना.. माझ्या पायाचा थोडासा धक्का लागला तयारच नाही... इरा मी सांगते असे का होते... पहिल्यांदा ज्या झाडाला तुझा पाय लागला आणि ते झाड मिटून गेलं ना त्या झाडाचा नाव आहे लाजाळू . कुठल्याही वस्तूचा हातचा स्पर्श झाला ना की झाडाची पानं मिटून जातात .म्हणून त्याला लाजाळूचं झाड म्हणतात.

इराचा पुढचा प्रश्न तयारच..पण हे का होतं आणि कसं होतं?

इरा त्याची एक गंमत आहे...नीट ऐक हं... लाजाळू च्या पानामध्ये

टर्गर नावाचा द्रवरस म्हणजे पाण्यासारखा पदार्थ असतो. या पाण्यासारख्या पदार्थाच्या

दबाव म्हणजे दाब यामुळे

पाने ताठ असतात.आणि जेव्हा एखाद्या वास्तूचा, व्यक्तीचा लाजाळू च्या पानांना स्पर्श होतो तेव्हा ट र्गर चा दाब कमी होतो आणि पाने मिटतात .

याशिवाय शास्त्रज्ञ असं ही सांगतात की हे झाड प्राण्यांपासून संरक्षण मिळण्यासाठी आपली पाने मिटवून टाकतात. कळलं का इरा बाई?

अगं,इरा यालाच निसर्गाची किमया म्हणतात... आता हे किमया काय आहे. बुवा... इरा तू शाळेत जादूचे प्रयोग पाहिलेस ना....तसेच. ही निसर्गाची जादूच आहे. मग निसर्ग म्हणजे काय ते सुद्धा सांग मला....हो हो सांगणारच आहे. तर आता ऐक!!!

आपल्या अवतीभोवती असते. हवा...आपण श्वास घेतो की नाही ती सगळी हवा तर ही हवा, अग्नी, पाणी ,झाडे झुडुपे, पशू,पक्षी,पृथ्वी यांचा साऱ्यांचा मिळून निसर्ग असतो. आणि बरं का इरा बेटा आपण या जागेवर राहतो ना ती पृथ्वी असते.

आपण सहलीला गेल्यावर पाण्याचे धबधबे ,नदी,समुद्र हे सगळं बघतो ना हे सर्व निसर्गाचाच भाग आहे. कळलं का इरा तुला ?? हो थोडथोड कळतंय... चल, आता आपण वेगवेगळे पक्षी पाहू....बघ हं!!! आता कशी गंमत आहे ते... आपल्या मागच्या परसात कितीतरी झाडं आहेत त्यावर रोज कावळा बसतो... काव काव काव करत असतो. हो हो. आई तो काळा काळा असतो तोच ना? शाब्बास इरा,,तोच कावळा काळा काळा असतो...तर तुझ्या आवडीचा पोपट हिरवागार असतो..त्याची चोंच आणि डोळा लाल लाल बूँद असतात. आता अजून एक पक्षी ते बघ ते बघ...त्या तिथे मोर बघ कसा छान पिसारा फुलवून नाच करातोय. पाहिलंस का इरा. .. हां आता सांग बरं किती रंग आहे मोराच्या अंगावर.???

हिरवा, निळा आणि एक काहीतरी वेगळाच रंग आहे...आई मला नाही सांगता येत मोराचा तिसरा रंग....असे म्हणून इरा हिरमुसली... अगं इरा, तिसरा रंग निळा आणि हिरवा मिक्स झाला की तो वेगळा रंग मोरपंखी रंग तयार होतो...आता बघ हं!! कावळा काळा, मोर... निळा हिरवा आणि मोर पंखी असे तीन आणि सुंदर रंग बघायला मिळतात..हीच तर निसर्गाची अजून एक जादू...असाच सर्व पक्षांचा आकार रंग वेगवेगळा असतो. ते बघ इरा लवकर बघ वर आकाशात बगळे उडत आहेत...ते कसे पांढरे शुभ्र आहे. आणि एक ओळीत ,तेही समुहाने म्हणजे ग्रुप ने उडत आहेत.आहे की नाही जादू!!!

चला आता आपण अजून पुढे जाऊ...

हे बघ इथे तळे आहे...या तळ्यात कोण कोण आहे ते पाहू या आपण.

आई इथे तळ्यात मासे पण आहेत...बघ किती जोरजोरात इकडून तिकडे पळत आहेत.... इरा मासे फक्त पाण्यातच राहू शकतात..माश्यांना पाण्या बाहेर काढले तर ते मरतात बरं का.... इरा अजून काय आहे बघ बरं तळ्यामधे.... आई हे गोऱ्या गोऱ्या कापसा सारख्या दिसणाऱ्या सश्याच्या गोष्टीतलं कासव दिसतंय...इथे कधी आलं... आणि अशी गोष्ट तू मला कधीच सांगितली नाहीस... त्या बाल वयातील इराची शंका..

अगं, इरा जिथे तिथे पाणी असते..ना तिथे तिथे मासे कासव बेडूक आणि साप ही असतातच. आता बघ हं इरा कासव, बेडूक आणि साप हे मात्र पाण्यात आणि जमिनीवर सुद्धा राहू शकतात. म्हणून त्यांना उभयचर प्राणी म्हणतात. आणि मासा फक्त पाण्यातच राहतो...म्हणून मासा जलचर प्राणी म्हणून ओळखला जातो.

इरा बेटा पाणी हे माशाचे घरचं असत. म्हणून ते तिथे राहतात.

ए आई त्यांची किती मजा आहे ना? सारखंच पाण्यात पोहायला मिळतं...तू मात्र मला रंगपंचमीला रंग खेळताना पाण्यात नाही खेळू देत...

म्हणतेस सर्दी होते...मला ही असे पाण्यात सारखंच खेळता आलं तर किती मजा येईल. असे म्हणून तिला हसू येत.आनंद होत होता.



इरा आता अंधार पडतोय आता आपण घरी जाऊया. खूप चालून. चालून तुला भूक लागली असेल.घरी जाऊन जेवण कर आणि झोपी जा.

**– सौ रचना गि. वसेकर**
नांदेड सिटी,पुणे
९४२२१७५७४९

# म्हणींच्या गोष्टी – गरज सरो नि वैद्य मरो

एका मोठ्या गावात धनिराम नावाचा एक अतिशय श्रीमंत पण कंजूष सावकार राहत होता. त्याच्याकडे अफाट संपत्ती होती, पण मनाने तो तितकाच गरीब होता.

एकदा धनिरामला एका विचित्र आजाराने ग्रासले. त्याचे पाय अचानक आखडले आणि त्याला चालणे-फिरणे कठीण झाले. त्याने अनेक मोठमोठ्या डॉक्टरांना बोलावले, पण कोणालाही त्याचा आजार बरा करता आला नाही.

शेवटी गावातील एका साध्या पण अत्यंत अनुभवी वैद्यांकडे धनिरामला नेण्यात आले. वैद्यांनी त्याची तपासणी केली आणि म्हणाले, ''सावकार, काळजी करू नका. मी तुम्हाला नक्की बरे करेन. पण यासाठी खूप मेहनत आणि दुर्मिळ औषधे लागतील.''

आजाराने हैराण झालेल्या धनिरामने वैद्यांचे हात धरले आणि म्हणाला, ''वैद्यराज, मला कसंही करून पुन्हा चालायला लावा. तुम्ही म्हणाल तेवढ्या सुवर्णमुद्रा मी तुम्हाला बक्षीस म्हणून देईन. माझी सगळी संपत्ती तुमच्या पायाशी ओतीन, पण मला बरं करा!'' वैद्यांनी उपचार सुरू केले. दिवसरात्र मेहनत करून त्यांनी रानातील औषधी वनस्पती आणल्या आणि सावकारावर उपचार केले. हळूहळू सावकाराच्या प्रकृतीत सुधारणा होऊ लागली. महिनाभरातच सावकार स्वतःच्या पायावर उभा राहिला आणि चालू लागला.

जेव्हा सावकार पूर्णपणे बरा झाला, त्या दिवशी वैद्यराज आपल्या कष्टाचे फळ मिळेल या आशेने त्याच्या घरी गेले. वैद्यांना पाहताच त्याच्या कपाळावर आठ्या आल्या.

वैद्यराज नम्रपणे म्हणाले, ''सावकार, आता तुमची प्रकृती उत्तम आहे. माझ्या औषधांचा खर्च आणि मेहनतीचा मोबदला दिलात, तर उपकार होतील.''

सावकार उपरोधाने हसून म्हणाला, ''कसला मोबदला? तुम्ही फक्त काही पालापाचोळा आणि पाणीच तर दिले होते. त्यासाठी मी माझी कष्टाची कमाई तुम्हाला का देऊ? चालते व्हा आणि पुन्हा इकडे फिरकू नका!''

वैद्यराज काहीही न बोलता तिथून निघून गेले. त्यांना पैशांचे दुःख नव्हते, पण सावकाराच्या कृतघ्नपणाचे वाईट वाटले. गावकऱ्यांनी जेव्हा हे पाहिले, तेव्हा त्यांच्या तोंडी एकच वाक्य आले ''गरज सरो नि वैद्य मरो!''

काही दिवसांनी सावकाराला पुन्हा तोच त्रास जाणवू लागला, पण यावेळी त्याच्या मदतीला कोणीही धावून आले नाही.

बोध : संकटकाळी मदत करणाऱ्या व्यक्तीची किंमत काम झाल्यानंतरही विसरू नये. कृतघ्नपणा माणसाला शेवटी एकटे पाडतो.

**मंगेश दौंडकर (पुणे)**
मो नं – ९८९०६१९३५४

